सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १८६८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २)

# मुंबईच्या तरी आणि अंतर्देशीय जलयाने यांबाबत अधिनियम, १८६८

(१३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

BOMBAY ACT No. II OF 1868

# The Bombay Ferries and Inland Vessels Act, 1868

*(As modified upto 13th November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

२००६

[ किंमत रु. ६ ]

# The Bombay Ferries and Inland Vessels Act, 1868

(BOMBAY II OF 1868)

# मुंबईचा तरी आणि अंतर्देशीय जलयाने यांबाबत अधिनियम, १८६८

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | व्याख्या. | ३ |
| २. | सार्वजनिक तरी ठरविण्याचा व नवीन तरी स्थापन करण्याचा व अस्तित्वात असलेल्या तरी बंद करण्याचा अधिकार कमिशनरला आहे. | ३ |
| २-क. | सार्वजनिक तरी स्थानिक संस्थांकडे जाणे, त्यांच्या संबंधात स्थानिक संस्थांचे अधिकार. | ३ |
| ३. | दस्तुरीचे दर. | ४ |
| | दस्तुरीची माफी. | ४ |
| ४. | दस्तुरी घेणारे वगैरे यांची नेमणूक व वेतन वगैरे. | ४ |
| ५. | कमिशनरास सार्वजनिक तरींचा मक्ता जाहीर लिलावाने किंवा खाजगी कराराने देण्याचा अधिकार आहे. | ४ |
| ५-क. | मक्ता रद्द करण्याचा अधिकार. | ४ |
| ५-ख. | मक्ता स्वाधीन करणे. | ५ |
| ५-ग. | मक्ता स्वाधीन केल्यावर बोटी वगैरेंचा कब्जा घेण्याचा अधिकार. | ५ |
| ६. | ठेकेदारांच्या नोकरांनी केलेली कृत्ये. | ५ |
| ७. | दस्तुरीचे कोष्टक टांगून ठेवणे. | ५ |
| ८. | दस्तुरीच्या कोष्टकासंबंधी शास्ती. | ५ |
| ९. | अवैध दस्तुरी घेण्याबद्दल शास्ती. | ६ |
| १०. | बुद्धया विलंब केल्याबद्दल शास्ती. | ६ |
| ११. | दस्तुरी देण्याचे नाकारल्याबद्दल किंवा ती देण्याची टाळाटाळ केल्याबद्दल आणि अडथळा किंवा नुकसानी केल्याबद्दल शास्ती. | ६ |
| ११-क. | अविचारी नौपरिवहन आणि इमारती लाकडांचे ढीग रचणे याबद्दल शास्ती. | ७ |
| ११-ख. | अधिपत्राशिवाय अटक करण्याचा अधिकार. | ७ |

# अनुक्रमणिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ११-ग. | फौजदारी न्यायाधिशास नुकसानीची आकारणी करण्याचा अधिकार. | ७ |
| १२. | सार्वजनिक तरींचे नियमन करण्याकरिता ज्यास नियम तयार करता येतील असे अधिकारी. | ७ |
| १३. | मुंबई येथे लायसनवाचून उतारू किंवा माल नेल्याबद्दल शास्ती. | ८ |
| | परंतुक | |
| १४. | [ रद्द केले ] | ८ |
| १४-क. | [ रद्द केले ] | ८ |
| १४-ख. | तरीची भरताडरेषा पाण्यात बुडालेली असताना किंवा तरीस विहित केलेली खुली बाजू नसताना तिच्यातून उतारू वगैरे नेण्याबद्दल शास्ती. | ८ |
| १४-ग. | कोणतीही नदी वगैरे यामधून कोणतेही जलयान चालविण्यासाठी लायसन आवश्यक. | ९ |
| १४-घ. | जलयानांची तपासणी करणे आणि ती समुद्रात चालविण्यास योग्य नसतील तर लायसन तहकूब करणे. | ९ |
| १४-ङ. | कोणतेही अपघात होऊ न देण्यासाठी जलयान चालविण्यास मनाई करण्याचा आणि जलयाने वगैरे यांचे अधिग्रहण करण्याचा अधिकार. | ९ |
| १४-च. | हा अधिनियम व त्याअन्वये केलेले नियम, विनियम व आदेश ह्यांच्या उपबंधांचा आणि कलम १४-क अन्वये दिलेल्या लायसनच्या शर्तींचा भंग केल्याबद्दल शास्ती. | १० |
| १४-छ. | भंग करण्यात आल्याबद्दल जलयानाचा मालक व ते स्वाधीन असलेला इसम हे दोघेही जबाबदार असतील. | १० |
| १५. | मुंबईत अपराधांचा इन्साफ करण्यासंबंधी. | १० |
| | शहराबाहेरील ठिकाणी इन्साफ करण्यासंबंधी; दंड वसूल करण्यासंबंधी. | १० |
| १६. | [ रद्द केले ] | ११ |
| १७. | राज्य सरकारास अधिकार सोपिवता येतील. | ११ |
| १७-क. | नियम व विनियम. | ११ |
| १७-ख. | " जलयान " या संज्ञेची व्याख्या. | १२ |
| १७-ग. | विवक्षित प्रकरणात कलमे १४-क ते १४-छ आणि १७-क व १७-ख यांचे उपबंध लागू नसणे. | १२ |
| १८. | लघु संज्ञा. | १२ |
| १९. | रद्द करणे आणि बचाव. | १२ |
| | अनुसूची. | १३ |

# सन १८६८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २[१]

## [मुंबईचा तरी आणि अंतर्देशीय जलयाने यांबाबत अधिनियम, १८६८]*

[१७ डिसेंबर १८६८]

हा अधिनियम पुढील अधिनियमान्वये अंशत: रद्द करण्यात आला आहे :--

सन १८७३ चा अधिनियम १२.

सन १९०१ चा अधिनियम २.

सन १९२० चा अधिनियम ३८.

सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३.

हा अधिनियम पुढील अधिनियमान्वये (मुंबई शहराव्यतिरिक्त इतर ठिकाणी) अंशत: रद्द करण्यात आला आहे :--

सन १८८४ चा मुंबई अधिनियम १.

हा अधिनियम पुढील अधिनियमान्वये सुधारण्यात आला आहे :--

सन १८७८ चा मुंबई अधिनियम २.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम ८.

सन १९३३ चा मुंबई अधिनियम ४.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत.

---

* हा अधिनियम उर्वरित मुंबई राज्यास लागू करण्यात आला व अंमलात आला (१९५९ चा मुंबई ६०, कलम २ अन्वये)

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई सरकारचे राजपत्र, १८६८, भाग पाच पृष्ठ ४२५, निवड समितीच्या अहवालासाठी त्यातील पृष्ठ ४४८ अणि परिषदेच्या कामकाजासाठी त्यातील पृष्ठ ४५७, ४७६ आणि ५८२ पहावे. १९६८ चा मुंबई २ अन्वये स्थापन केलेल्या सार्वजनिक तरींचे निव्वळ उत्पन्न आणि अधिनियमात लादलेली व आकारलेली शास्ती ही मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ (१९२३ चा मुंबई ६) अन्वये घटित केलेल्या स्थानिक निधीत जमा करण्यात येईल. त्या अधिनियमाचे कलम ७५ पहा.

पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

† सन १९४२ चा मुंबई अधिनियम २१.

‡ सन १९४५ चा मुंबई अधिनियम १७.

विधि अनुकूल आदेश, १९५० द्वारे अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम ८.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम ६०.

ह्या अधिनियमात आदेशाद्वारे अनुकूलन व रूपभेद करण्यात आले आहेत :--

महा. विधि अनुकूलन आदेश (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत.

[२][ मुंबई राज्यातील] सार्वजनिक तरी [१][आणि अंतर्देशीय जलयाने यांबाबतचा] विधि सुधारण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** [२][ मुंबई राज्यातील] सार्वजनिक तरी [१][आणि अंतर्देशीय जलयाने यांबाबतचा] विधि सुधारणे इष्ट आहे; **त्याअर्थी** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :--

---

† सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २ द्वारे या अधिनियमाची कलमे २ ते ८ ही पुन:नियमित करण्यात आली आहेत.

‡ हा अधिनियम करण्यात आला आणि उक्त अधिनियमाचे कलम ९ व अनुसूची ई याअन्वये करण्यात आलेल्या सुधारणा सन १९४७ चा मुंबई अधिनियम ५२, कलम २ या अन्वये अंमलात असल्याचे चालू ठेवण्यात आले.

[१] वरील मजकूर १९४२ चा मुंबई २१ चे कलम २ तसेच सन १९४७ चा मुंबई ५५, कलम २ अन्वये समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९५९ चा मुंबई ६०, कलम ४ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ १. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, ह्या अधिनियमात-- व्याख्या.

(क) लोककर्म विभागाकडून नियंत्रण ठेवण्यात येणाऱ्या तरीच्या संबंधात, ''कमिशनर'' या संज्ञेत, सुपरिन्टेंडिंग इंजिनियर याचा समावेश होतो;

(ख) ''तर'' या संज्ञेत, तरी म्हणून वापरावयाच्या तात्पुरत्या पुलाचा आणि तरीकडे जाण्याच्या व तरीतून उतरण्याच्या जागा यांचा समावेश होतो.]

सार्वजनिक तरी ठरविण्याचा व नवीन तरी स्थापन करण्याचा व अस्तित्वात असलेल्या तरी बंद करण्याचा अधिकार [२][कमिशनरला] आहे.

२. [२][ कमिशनरास] [३][ महाराष्ट्र राज्यातील] कोणत्या तरी सार्वजनिक तरी समजाव्या हे अधिसूचनेद्वारे जाहीर करता येईल. तसेच त्यास वेळोवेळी, अधिसूचनेद्वारे, कोणतीही नवीन सार्वजनिक तर स्थापन करता येईल किंवा अस्तित्वात असलेली कोणतीही सार्वजनिक तर बंद करता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल.

सार्वजनिक तरी स्थानिक संस्थांकडे जाणे; त्यांच्या संबंधात स्थानिक संस्थांचे अधिकार.

[४][ २-क. तसेच [२][कमिशनरला], [५][राजपत्रात] अधिसूचना प्रसिद्ध करून, कलम २ अन्वये अधिसूचित केलेली कोणतीही सार्वजनिक तर ज्या एका किंवा अनेक क्षेत्रात ती असेल त्यावर अधिकार चालविणाऱ्या स्थानिक मंडळीमध्ये किंवा संयुक्तपणे स्थानिक मंडळ्यांमध्ये निहित होईल असे जाहीर करता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल आणि त्यानंतर अशा स्थानिक मंडळीने किंवा मंडळ्यांनी अशा तरीच्या संबंधात या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेले सर्व अधिकार चालविले पाहिजेत :

परंतु, कलम ३, खंड (घ) अन्वये दिलेला माफीसंबंधीचा अधिकार हा [२][कमिशनरासही] चालविता येईल.

स्पष्टीकरण.-- या कलमाच्या प्रयोजनाकरिता, ''स्थानिक मंडळी'' या संज्ञेचा अर्थ, जिल्हा स्थानिक मंडळ किंवा नगरपालिका असा समजावा.]

---

[१] कलम १ हे सन १९५९ चा मुंबई ६०, कलम ४ (ब) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५८ चा मुंबई ८, कलम ३, अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९२३ चा मुंबई ८, कलम २ अन्वये कलम २-क समाविष्ट करण्यात आले.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये मूळ मजुकराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

दस्तुरीचे दर. ३. कोणत्याही सार्वजनिक तरींतून नेलेले सर्व उतारू, गाडे, गाड्या, गुरे व इतर जनावरे यांवर आणि सर्व मालांवर व व्यापाराच्या जिनसांवर [१] [राज्य सरकार] वेळोवेळी मंजूर करील अशा दरांनी दस्तुरी बसविण्यात आली पाहिजे :

दस्तुरीची माफी. परंतु, पुढील इसमांकडून दस्तुरी वसूल करता कामा नये :--

(क) [२] [हा खंड सन १९०१ चा अधिनियम २, कलम ३ याअन्वये रद्द करण्यात आला.]

(ख) कामावर असलेला व गणवेषात असलेला कोणताही पोलीस अधिकारी;

(ग) पोलिसाच्या अभिरक्षेत असलेला कोणताही इसम;

(घ) [३] [राजपत्रात] अधिसूचना प्रसिद्ध करून ज्या कोणत्याही इसमास अशा दस्तुरीची विशेषत: माफी देणे [१] [राज्य सरकारास] योग्य वाटेल असा इसम.

दस्तुरी घेणारे वगैरे यांची नेमणूक व वेतन वगैरे. ४. [४] [कमिशनरास] कोणत्याही सार्वजनिक तरीची व्यवस्था ठेवण्यासाठी व तिचे काम चालविण्यासाठी दस्तुरी घेणारे व नावाडी व इतर नोकर नेमण्याची तरतूद करता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल; आणि अशा इसमांचे वेतन या अधिनियमान्वये उभारलेल्या पैशातून किंवा स्थानिक महसुलाच्या इतर उत्पन्नातून दिले पाहिजे, परंतु ते सामान्य [५] ** महसुलातून [५] ** देता कामा नये.

[४] [कमिशनरास] सार्वजनिक तरींचा मक्ता जाहीर लिलावाने किंवा खाजगी कराराने देण्याचा अधिकार आहे. ५. [४] [कमिशनरास] योग्य वाटतील अशा अटींवर, कोणत्याही सार्वजनिक तरींचा मक्ता वर्षावर्षाने किंवा सात वर्षांपेक्षा अधिक नाही अशा जास्त मुदतीपर्यंत, जाहीर लिलावाने किंवा खाजगी कराराने देता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल. अशा बाबतीत ठेकेदाराने किंवा मक्तेदाराने करार लिहून दिला पाहिजे, आणि अशा करारात ज्या शर्तीवर मक्त्याने तर धारण करावयाची त्या शर्ती करारात दाखल केल्या पाहिजेत, आणि करार योग्य रीतीने पुरा करण्यासाठी त्याने तारण दिले पाहिजे; आणि करारनाम्यात लिहिल्याप्रमाणे कराराचा किंवा जाहीर लिलाव करून मक्ता दिला असेल तर विक्रीच्या शर्तींचा भंग केल्याबद्दल पैशाच्या रूपाने जप्ती आणावयाची असल्यास तिची अंमलबजावणी जमीन महसुलाच्या मागणीची रक्कम त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विधिअन्वये ज्या रीतीने वसूल करण्यात येते त्याचरीतीने शक्य तेथवर करण्याचा अधिकार आहे.

मक्ता रद्द करण्याचा अधिकार. [६] [५-क. (१) कमिशनरास, कोणत्याही सार्वजनिक तरीच्या दस्तुरीचा मक्ता रद्द करण्याचा अधिकार आहे; मात्र त्यास, मक्ता रद्द करण्याच्या आपल्या इराद्याची, मक्तेदारास दिलेल्या लेखी नोटिशीची सहा महिन्यांची मुदत संपल्यानंतरच असे करता येईल.

(२) जेव्हा एखादा मक्ता ह्या कलमान्वये रद्द केला असेल तेव्हा, ज्याच्या क्षेत्राधिकारात अशी तर असेल अशा विभागाच्या एक्झिक्युटिव्ह इंजिनीअरने किंवा यथास्थिति, जिल्ह्याच्या कलेक्टराने, कमिशनरच्या आगाऊ मंजुरीने तो ठरवील अशी नुकसानभरपाई मक्तेदारास दिली पाहिजे.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] इंडियन टोल्स (आर्मी) ॲक्ट, १९०१ (१९०१ चा चार) द्वारे हे खंड निरसित करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये मूळ मजुकराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५८ चा मुंबई अधि. क्र. ८, कलम ३, अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] डिव्होल्यूशन ॲक्ट, १९२० (१९२० चा ३८), कलम २, व अनुसूची एक द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९५९ चा मुंबई अधि. क्र. ६०, कलम ४ (घ) द्वारे ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

**मक्ता स्वाधीन करणे.**

५-ख. सार्वजनिक तरीच्या दस्तुरीचा मक्ता ज्यास दिला असेल अशा मक्तेदारास, असा मक्ता स्वाधीन करण्याच्या आपल्या इराद्याची कमिशनरास दिलेल्या लेखी नोटिशीची एक महिन्याची मुदत संपल्यावर आणि ज्याच्या क्षेत्राधिकारात अशी तर असेल अशा विभागाच्या एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरास किंवा यथास्थिति, जिल्ह्याच्या कलेक्टरास, उक्त एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर किंवा कलेक्टर, कमिशनरच्या मंजुरीस अधीन राहून, प्रत्येक बाबतीत निदेश देईल अशी नुकसानभरपाई दिल्यावर, आपला मक्ता स्वाधीन करण्याचा अधिकार आहे.

**मक्ता स्वाधीन केल्यावर बोटी वगैरेचा कब्जा घेण्याचा अधिकार.**

५-ग. जेव्हा कोणत्याही तरीच्या दस्तुरींचा मक्ता कलम ५-ख अन्वये स्वाधीन करण्यात आला असेल तेव्हां, ज्याच्या क्षेत्राधिकारात अशी तर असेल अशा विभागाच्या एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरास किंवा, यथास्थिति, जिल्ह्याच्या कलेक्टरास, सर्व बोटी आणि त्यांची साधनसामग्री आणि अशा तरीच्या कारणासाठी मक्तेदाराने वापरलेले इतर सर्व सामान आणि उपकरणी यांचा कब्जा घेण्याचा अधिकार आहे, आणि उक्त विभागाचा एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर किंवा कलेक्टर यास, त्या बोटी आणि त्याची साधनसामग्री आणि अशा तरीच्या कारणासाठी मक्तेदाराने वापरलेले इतर सर्व सामान आणि उपकरणी याऐवजी योग्य बोटी वैगेरे तो सोईस्करपणे मिळवू शकेपर्यंत (त्याच्या उपयोगासाठी कमिशनर प्रत्येक बाबतीत निर्दिष्ट करील अशी नुकसानभरपाई देऊन), ती वापरण्याचा अधिकार आहे.]

**ठेकेदारांच्या नोकरांनी केलेली कृत्ये.**

६. जेव्हा कोणतीही सार्वजनिक तर योग्य रीतीने पट्ट्याने किंवा मक्त्याने दिली असेल तेव्हा :-- पट्टेदाराचा, ठेकेदाराचा किंवा मक्तेदाराचा प्रत्येक नोकर हा, अशा पट्टेदाराने किंवा ठेकेदाराने किंवा मक्तेदाराने तयार केलेल्या व [१] [ कमिशनरने ] मंजुरी दिलेल्या व कोणत्याही विनियमान्वये, सुरक्षिततेसाठी किंवा आवश्यक असलेले किंवा साहाय्यभूत असलेले जे कृत्य करणे त्यास भाग आहे ते प्रत्येक कृत्य करण्यास वैधत: बांधलेला आहे असे समजले पाहिजे, आणि अशा विनियमासंबंधी अशा नोकरास नोटीस देण्यात आलेली असली पाहिजे; तसेच अशा प्रत्येक नोकरास ज्या कृत्यामुळे धोका पोहोचण्याचा संभव असेल, आणि जे कृत्य करण्यास त्यास अशा कोणत्याही विनियमान्वये मनाई केलेली असेल असे प्रत्येक कृत्य करण्यास वैधत: मनाई करण्यात आलेली आहे असे समजले पाहिजे, तसेच कोणतेही कृत्य करण्यासाठी अशा पट्टेदाराने, ठेकेदाराने किंवा मक्तेदाराने किंवा त्याच्यातर्फे कामावर लावलेला प्रत्येक इसम हा, पट्टेदाराचा, ठेकेदाराचा किंवा मक्तेदाराचा नोकर आहे असे समजले पाहिजे.

**दस्तुरीचे कोष्टक टांगून ठेवणे.**

७. दस्तुरी घेणाऱ्या प्रत्येक इसमाने किंवा दस्तुरीच्या प्रत्येक ठेकेदाराने किंवा प्रत्येक मक्तेदाराने इंग्रजीत व जिल्ह्याच्या भाषेत लिहिलेले किंवा छापलेले दस्तुरीचे कोष्टक त्याच्या तरीच्या ठाण्यात लोकांच्या सहज दृष्टीस पडेल अशा जागी टांगून ठेवणे हे त्यांचे कर्तव्य असेल; [२][ आणि विभागाच्या एक्झिक्युटिव्ह इंजिनीअरने किंवा, यथास्थिति, जिल्ह्याच्या कलेक्टरने किंवा ह्या बाबतीत तो नेमील अशा इतर अधिकाऱ्याने सही केलेली दस्तुरीची यादी, मागणी केली असता, हजर करण्यास तो बांधलेला असेल. ]

**दस्तुरीच्या कोष्टकासंबंधी शास्ती.**

८. दस्तुरी घेणाऱ्या कोणत्याही इसमाने किंवा दस्तुरीच्या ठेकेदाराने किंवा मक्तेदाराने पूर्वोक्त दस्तुरीचे कोष्टक टांगून ठेवण्यात व सुव्यवस्थित व चांगल्या स्थितीत ठेवण्यात हयगय केल्यास अथवा ते बुद्धिपुरस्सर

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधि. क्र. ८, कलम ३, अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५९ चा मुंबई अधि. क्र. ६०, कलम ४ (ड) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

काढून नेल्यास किंवा त्यात फेरफार केल्यास किंवा ते खराब केल्यास किंवा वाचता न येईल अशा स्थितीत राहू दिल्यास, [१][ किंवा जो कलम ७ मध्ये उल्लेखिलेली दस्तुरींची यादी मागणी केली असता हजर करण्यात कसूर करील, तो, प्रत्येक वेळी दोषी ठरविण्यात आला असता, पन्नास रुपयांहून अधिक नाही इतक्या दंडास पात्र होईल. ]

अवैध दस्तुरी घेण्याबद्दल शास्ती.

९. कलम ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दस्तुरी घेणारा कोणताही इसम किंवा इतर इसम नेमण्यात आला असेल त्याने दस्तुरी घेण्यात हयगय केल्यास किंवा दस्तुरीच्या कोष्टकात परवानगी दिलेल्या दस्तुरी व्यतिरिक्त इतर दस्तुरी मागितल्यास किंवा घेतल्यास आणि दस्तुरीच्या कोणत्याही ठेकेदाराने किंवा मक्तेदाराने किंवा दस्तुरीच्या ठेकेदाराच्या किंवा मक्तेदाराच्या नोकरीतील कोणत्याही इसमाने दस्तुरीच्या कोष्टकात परवानगी दिलेल्या दस्तुरीहून अधिक दस्तुरी मागितल्यास किंवा घेतल्यास तो, प्रत्येक वेळी दोषी ठरविण्यात आला असता [२][ शंभर रुपयांहून ] अधिक नाही इतक्या शास्तीस पात्र होईल.

बुद्धया विलंब केल्याबद्दल शास्ती.

१०. कलम ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दस्तुरी घेणारा कोणताही इसम किंवा इतर इसम नेमला असेल त्याने किंवा दस्तुरीच्या ठेकेदाराने किंवा मक्तेदाराने किंवा दस्तुरीच्या ठेकेदाराच्या किंवा मक्तेदाराच्या नोकरीतील कोणत्याही इसमाने योग्य कारणांवाचून कोणताही उतारू किंवा गाडा किंवा गाडी किंवा जनावर किंवा माल यांचा खोळंबा केल्यास तो शंभर रुपयांहून अधिक नाही इतक्या शास्तीस पात्र होईल.

दस्तुरी देण्याचे नाकारल्याबद्दल किंवा ती देण्याची टाळाटाळ केल्याबद्दल आणि अडथळा किंवा नुकसानी केल्याबद्दल शास्ती.

११. जो कोणी इसम वैध दस्तुरी देण्याचे नाकारील, अथवा दस्तुरी देण्याचे टाळण्याच्या इराद्याने कोणत्याही तरीच्या ठाण्यांमधून दस्तुरी न देता जाईल, अथवा दस्तुरी घेणारा इसम किंवा सार्वजनिक तरीची व्यवस्था ठेवण्याच्या किंवा ती चालविण्याच्या कामी वैध रीतीने नेमलेला कोणताही इसम आपले कर्तव्य पार पाडीत असताना त्यास जो कोणी इसम अडथळा करील, तसेच--कोणत्याही तरीच्या दस्तुरीच्या दांड्याची किंवा होडीची किंवा सार्वजनिक तरीच्या इतर वस्तूंची दुष्ट बुद्धीने नुकसानी करील, अथवा यात यापूर्वी निर्दिष्ट केल्याप्रमाणे टांगून ठेवलेले दस्तुरीचे कोणतेही कोष्टक दुष्ट बुद्धीने काढून नेईल, त्यात फेरफार करील, ते नष्ट करील किंवा त्याचे नुकसान करील;

[३][ किंवा जो, अशा कोणत्याही दस्तुरी घेणाऱ्याने किंवा सार्वजनिक तरीची व्यवस्था ठेवण्याच्या किंवा ती चालविण्याच्या कामी वैधरीत्या कामावर लावलेल्या इसमाने तसे न करण्याची ताकीद दिली असूनही, सार्वजनिक तरीच्या ठिकाणी, जी मानवी जीवित किंवा मालमत्ता धोक्यात येईल अशा परिस्थितीत आहे किंवा इतकी भरलेली आहे अशा कोणत्याही तरीवर किंवा तरीस संबद्ध असलेल्या कोणत्याही पुलावर जाईल किंवा कोणतीही जनावरे, वाहने किंवा वस्तु नेईल किंवा जो, अशा दस्तुरी घेणाऱ्याने किंवा सार्वजनिक तरीची व्यवस्था ठेवण्याच्या किंवा ती चालविण्याच्या कामी वैधरीत्या कामावर लावलेल्या इसमाने तसे करण्याची विनंती केली असता, अशा कोणत्याही तरीची बोट सोडण्याचे किंवा अशा कोणत्याही तरीच्या बोटीवरून कोणतीही जनावरे, वाहने किंवा माल काढून नेण्याचे नाकारील किंवा त्यात हयगय करील ] तो ज्या किंमतीइतके नुकसान झाले असेल त्या किंमतीखेरीज आणखीन पन्नास रुपयांहून अधिक नाही इतक्या शास्तीस पात्र होईल.

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधि. क्र ६०, कलम ४ (च) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४ (छ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधि. क्र. ६०, कलम ४ (ज) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**अविचारी नौपरिवहन आणि इमारती लाकडांचे ढीग रचणे याबद्दल शास्ती.**

[1] [ ११-क. जो कोणी, कोणतेही जलयान किंवा तराफा, सार्वजनिक तरीची नासधूस होईल इतक्या अविचाराने किंवा हयगयीने चालवील, नांगरील, उभा करील किंवा बांधील किंवा कोणत्याही इमारतीच्या लाकडाचा ढीग रचील, त्यास पराकाष्ठा तीन महिने मुदतीची कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा पाचशे रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील, आणि दस्तुरी घेणाऱ्यास किंवा अशा तरीची व्यवस्था ठेवण्याच्या किंवा ती चालविण्याच्या कामी वैधरीत्या कामावर लावलेल्या इसमास, असे जलयान, तराफा किंवा इमारती लाकूड, यापुढे निर्दिष्ट केलेली चौकशी आणि आकारणी होईपर्यंत जप्त करण्याचा किंवा अटकावून ठेवण्याचा अधिकार आहे.

**अधिपत्राशिवाय अटक करण्याचा अधिकार.**

११-ख. एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास, कलम ११ किंवा कलम ११-क याविरुद्ध अपराध करणाऱ्या कोणत्याही इसमास अधिपत्राशिवाय अटक करण्याचा अधिकार आहे.

**फौजदारी न्यायाधिशास नुकसानीची आकारणी करण्याचा अधिकार.**

११-ग. ह्या अधिनियमान्वये कोणत्याही अपराधाचा इन्साफ करणाऱ्या कोणत्याही फौजदारी न्यायाधिशास, संबंधित तरीच्या बाबतीत अपराध्याने कोणतेही नुकसान केले किंवा करविले असल्यास त्या नुकसानीसंबंधी चौकशी करण्याचा किंवा नुकसानीच्या किंमतीची आकारणी करण्याचा अधिकार आहे आणि ह्या अधिनियमान्वये अपराध्यावर लादण्यात आलेल्या कोणत्याही दंडाशिवाय अशा किंमतीची रक्कम त्याने द्यावी असा आदेश फौजदारी न्यायाधिशाने दिला पाहिजे; आणि जी रक्कम देण्याविषयी अशा रीतीने आदेश देण्यात आला असेल ती रक्कम, जणू तो दंड होता असे समजून वसूल करण्याजोगी असेल, किंवा उक्त अपराध कलम ११-क अन्वये केलेला असेल तेव्हा, ज्यामुळे नुकसानी झाली असेल त्या जलयानाची, तराफ्याची किंवा इमारती लाकडाची विक्री करून वसूल करण्याजोगी असेल. ]

**सार्वजनिक तरींचे नियमन करण्याकरिता ज्यास नियम तयार करता येतील असे अधिकारी.**

१२. [2] [ कलम १४-ख, पोट-कलम (२) यात व इतरत्र तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत :--

(क) लोककर्म विभागाच्या एखाद्या विभागाच्या एक्झिक्युटिव्ह इंजिनीयरच्या नियंत्रणाखालील रस्त्यांवरील सार्वजनिक तरीच्या बाबतीत अशा एक्झिक्युटिव्ह इंजिनीयरास, आणि

(ख) इतर सर्व बाबतीत जिल्ह्याच्या कलेक्टरास, ]

[3] [ राज्य सरकार ] जे सामान्य निदेश वेळोवेळी देईल त्यास अधीन राहून, पुढील गोष्टींसाठी नियम करण्याचा अधिकार आहे :--

कोणत्याही सार्वजनिक तरींतून एका खेपेस किती उतारू, गाडे, गाड्या व जनावरे व माल नेता येईल ते ठरविणे; आणि उतारू व माल सुरक्षितपणे, जलद व सोईस्कर रीतीने नेणे व उतरविणे;

आणि तरी चांगल्या स्थितीत ठेवणे आणि अन्यथा दस्तुरीचा ठेकेदार किंवा मक्तेदार व दस्तुरी घेणारे इसम, आणि कोणत्याही सार्वजनिक तरीच्या कामावर लावलेले इतर इसम यांनी आपली कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडणे.

---

[1] सन १९५९ चा मुंबई अधि. क्र. ६०, कलम ४ (झ) अन्वये ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९३३चा मुंबई अधि. क्र. ४, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

आणि कोणताही दस्तुरीचा ठेकेदार किंवा मक्तेदार किंवा दस्तुरी घेणारा इसम किंवा नावाडी किंवा इतर इसम अशा कोणत्याही नियमांचा भंग करील किंवा त्याची अवज्ञा करील तर तो त्यामुळे झालेला कोणताही तोटा किंवा नुकसान भरून देण्यास जबाबदार असेल; ज्या कोणत्याही फौजदारी न्यायाधिशाच्या अधिकारक्षेत्रात अपराध घडला असेल त्यास, संक्षिप्त रीतीने काम चालवून, अशा तोट्याची किंवा नुकसानीची रक्कम ठरविण्याचा अधिकार आहे आणि अशी रक्कम ह्या अधिनियमान्वये केलेल्या शास्तीची कोणतीही रक्कम ज्या रीतीने वसूल करता येईल त्या रीतीने वसूल करण्याचा अधिकार आहे.

मुंबई येथे लायसनवाचून उतारू किंवा माल नेल्याबद्दल शास्ती.

१३. जो कोणी इसम भाडे घेऊन, [१] [ राज्य सरकारकडून ] विशेष लायसन घेतल्यावाचून, कोणताही उतारू जनावर, गाडा, गाडी किंवा माल [२] [ बृहन्मुंबईच्या ] कोणत्याही भागाकडून मुंबई बंदराच्या पलीकडे, मुख्य भूमीकडे किंवा कोणत्याही लगतच्या बेटाकडे नेईल किंवा मुख्य भूमीकडून किंवा लगतच्या कोणत्याही बेटांकडून [२] [ बृहन्मुंबईच्या ] कोणत्याही भागाकडे आणील तो पाचशे रुपयापेक्षा अधिक नाही इतक्या शास्तीस पात्र हाईल;

परंतुक.

परंतु, [२] [ बृहन्मुंबईच्या ] एका भागाकडून तिच्या दुसऱ्या भागाकडे उतारू व जनावरे, गाडे व गाड्या आणि माल भाडे घेऊन बोटीने नेण्याच्या बाबतीत ही शास्ती लागू होणार नाही. तसेच ती जो कोणी इसम स्वत:स किंवा आपले कुटुंबास किंवा मित्रास किंवा नातलगास किंवा नोकरास नेण्यासाठी किंवा माल नेण्यासाठी कोणताही इसम कोणतीही बोट खास करून भाड्याने घेईल त्या इसमाच्या बाबतीत व उक्त कारणासाठी जो इसम बोट भाड्याने देईल त्या इसमास लागू होणार नाही.

लायसनवाचून उतारू वगैरे नेण्याबद्दल शास्ती.

१४ [३] [ सन १९४२ चा मुंबई अधिनियम २१ या अन्वये रद्द करण्यात आला. ]

* [ १४-क. * * * ]

तरीची भरताड रेषा पाण्यात बुडालेली असताना किंवा तरीस विहित केलेली खुली बाजू नसताना तिच्यातून उतारू वगैरे नेण्याबद्दल शास्ती.

[४] [ १४-ख. (१) तरीविहित केलेली भरताड रेषा पाण्यात बुडालेली असेल किंवा तरी विहित केलेल्या खुल्या बाजूपेक्षा कमी अशी खुली बाजू असेल तेव्हां जो कोणताही इसम, [५] [ भाडे घेऊन किंवा भाडे न घेता, कोणताही उतारू, जनावर, माल किंवा इतर वस्तु कोणत्याही नदीतून, ओढ्यातून, खाडीतून, तलावातून, तळ्यातून, किंवा जलयान जाऊ शकेल अशा इतर जलाशयातून ] नेईल तो पाचशे रुपयाहून अधिक नाही इतक्या शास्तीस पात्र होईल. ]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९४५ चा मुंबई अधि. क्र. १७, तसेच सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५२ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५५, कलम २ द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.

[४] सन १९३३ चा मुंबई अधि. क्र. ४, कलम ४ द्वारे कलम १४-ख समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९४२ चा मुंबई अधि. क्र. २१, कलम ५ तसेच सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५५, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* सन १९५९ चा मुंबई अधि. क्र. ६०, कलम ४ (ज) द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.

(२) [१][राज्य सरकारास] पोट-कलम (१) चे उपबंध ज्यास लागू आहेत अशा कोणत्याही [२][जलयानावर] भरताड रेषेची किंवा खुल्या बाजूची निशाणी ज्या रीतीने केली पाहिजे ती रीत विहित करण्यासंबंधी नियम करण्याचा अधिकार आहे. असे केलेले नियम [३] [ राजपत्रात ] प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत.]

कोणतीही नदी वगैरे या मधून कोणतेही जलयान चालविण्यासाठी लायसन आवश्यक.

[४] [ १४-ग. [१] [ राज्य ] सरकारने याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेल्या लायसनवाचून आणि हा अधिनियम व त्याअन्वये केलेले नियम, विनियम व आदेश यांच्या उपबंधास आणि अशा लायसनच्या शर्तींस अनुसरून असेल त्या व्यतिरिक्त इतर रीतीने, कोणत्याही इसमाने भाडे घेऊन किंवा भाडे न घेता, कोणत्याही नदीतून, ओढ्यातून, खाडीतून, तळ्यातून, तलावातून किंवा जलयान जाऊ शकेल अशा इतर जलाशयातून कोणतेही जलयान चालविता कामा नये :

परंतु, [१] [राज्य ] सराकारास, राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, अशा अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येतील अशी जलयाने किंवा अशा वर्गातील जलयाने ह्या कलमाच्या कक्षेतून वगळण्याचा अधिकार आहे. ]

जलयानांची तपासणी करणे आणि ती समुद्रात चालविण्यास योग्य नसतील तर लायसन तहकूब करणे.

[४] [ १४-घ. कोणत्याही फौजदारी न्यायाधिशास किंवा उपनिरीक्षकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा [१] [राज्य ] सरकारने याबाबत विशेष रीतीने अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास हा अधिनियम व त्याअन्वये केलेले नियम, विनियम व आदेश या उपबंधाचे आणि अशा जलयानाच्या संबंधाने दिलेल्या लायसनच्या शर्तीचे योग्य रीतीने पालन करण्यात येत आहे याविषयी स्वत:ची खात्री करून घेण्याच्या कारणांसाठी कोणत्याही जलयानावर चढण्याचा व त्याची तपासणी करण्याचा अधिकार आहे. अशा अधिकाऱ्याच्या मते जलयान समुद्रात चालविण्यास योग्य नसल्यास किंवा हे अपुरेपणे सुसज्जित असल्यास किंवा ते चालविल्याने मानवाच्या जीवितास किंवा सुरक्षिततेस ज्यायोगे धोका पोहोचेल अशा स्थितीत असल्यास, त्यास, अशा जलयानाच्या संबंधाने दिलेले लायसन तहकूब करण्याचा अधिकार आहे आणि त्यानंतर असे जलयान, लायसन तहकूब करण्यासंबंधीचा आदेश रद्द करण्यात येईपर्यंत किंवा अशा जलयानाच्या संबंधाने नवीन लायसन देण्यात येईपर्यंत चालविता कामा नये. ]

कोणतेही अपघात होऊ न देण्यासाठी जलयान चालविण्यास मनाई करण्याचा आणि जलयाने वगैरे यांचे अधिग्रहण करण्याचा अधिकार.

[४] [ १४-ङ. (१) कोणत्याही फौजदारी न्यायाधिशाचे किंवा उपनिरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याचे किंवा सहाय्यक किंवा प्रति इंजिनियरच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल अशा लोककर्म विभागाचा कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा याबाबत [१] [राज्य ] सराकारने विशेष रीतीने अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचे कोणत्याही वेळी असे मत होईल की, कोणताही अपघात टाळण्यासाठी किंवा मानवाच्या जीवितास किंवा सुरक्षिततेस असलेला धोका टाळण्यासाठी ह्या पोट-कलम अन्वये उपाययोजना करणे आवश्यक आहे तर, अशा फौजदारी न्यायाधिशास किंवा अधिकाऱ्यास, आदेशाद्वारे, अशा आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत, त्याच्या अधिकारक्षेत्राच्या हद्दीतील कोणतेही जलयान किंवा कोणत्याही वर्गाचे जलयान किंवा सामान्यत: सर्व जलयाने कोणत्याही नदीतून, ओढ्यातून, खाडीतून, तळ्यातून, तलावातून किंवा जलयान जाऊ शकेल अशा इतर जलाशयातून चालविण्यास मनाई करण्याचा अधिकार आहे. ]

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९४२ चा मुंबई अधि. क्र. २१, कलम ५ तसेच सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५५, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश यान्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९४२ चा मुंबई अधि. क्र. २१, कलम ६ तसेच सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५५, कलम २ द्वारे कलमे १४-ग, १४-घ आणि १४-ङ समाविष्ट करण्यात आली.

(२) अशा कोणत्याही फौजदारी न्यायाधिशास किंवा अधिकाऱ्यास, मानवी जीविताचा किंवा मालमत्तेचा बचाव करण्यासाठी आदेशाद्वारे, अशा आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीकरिता, त्याच्या अधिकारक्षेत्राच्या हद्दीतील बचावासाठी उपयोगी पडू शकेल अशा कोणत्याही जलयानाचा किंवा इतर मालमत्तेचा उपयोग करण्यासाठी त्यांचे अधिग्रहण करण्याचा अधिकार आहे. कोणत्याही फौजदारी न्यायाधिशाने किंवा अधिकाऱ्याने कोणत्याही मुदतीसाठी कोणत्याही जहाजाचा किंवा इतर मालमत्तेचा उपयोग करण्यासाठी त्यांचे अधिग्रहण केल्यास ज्या इसमाकडून ती काढून घेण्यात आली असतील त्या इसमांस उक्त मुक्तीसाठी असा फौजदारी न्यायाधीश किंवा अधिकारी ठरवील अशी नुकसानभरपाईची रक्कम देण्यात आली पाहिजे. नुकसानभरपाईच्या रकमेसंबंधाने आणि ज्या इसमांस अशी नुकसानभरपाई द्यावयाची त्या इसमासंबंधाने अशा फौजदारी न्यायाधिशाने किंवा अधिकाऱ्याने दिलेला निर्णय अखेरचा असेल.

हा अधिनियम व त्याअन्वये केलेले नियम, विनियम व आदेश ह्यांच्या उपबंधांचा आणि कलम १४-क अन्वये दिलेल्या लायसनच्या शर्तीचा भंग केल्याबद्दल शास्ती.

[१] [ १४-च. जो कोणताही इसम हा अधिनियम किंवा त्याअन्वये केलेले नियम, विनियम किंवा यांच्या उपबंधाचे किंवा आदेशाचे किंवा कलम १४-ग अन्वये दिलेल्या कोणत्याही लायसनच्या शर्तीचे उल्लंघन करील तो, दोषी ठरविण्यात आला असता, अशा उल्लंघनाबद्दल अधिनियमात इतर शास्तीची तरतूद केलेली नसेल तर, पराकाष्ठा सहा महिने मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा पराकाष्ठा एक हजार रुपयांच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल. ]

भंग करण्यात आल्याबद्दल जलयानाचा मालक व ते स्वाधीन असलेला इसम हे दोघेही जबाबदार असतील.

[१] [ १४-छ. हा अधिनियम किंवा त्याअन्वये केलेले नियम, विनियम किंवा आदेश याच्या उपबंधान्वये किंवा कलम १४-ग अन्वये दिलेल्या लायसनच्या शर्तीचे कोणत्याही जलयानाच्या बाबतीत उल्लंघन झाल्यास अशा जलयानाचा मालक व ते स्वाधीन असलेला इसम या दोघांनीही अशा उपबंधाचे उल्लंघन केले आहे असे समजले पाहिजे आणि ते दोघेही त्याबद्दल व्यक्तिशः जबाबदार असतील. ]

मुंबईत अपराधांचा इन्साफ करण्या संबंधी.

१५. [२] [ बृहन्मुंबईत] कोणत्याही पोलीस फौजदारी न्यायाधिशाने ह्या अधिनियमाविरुद्ध घडलेल्या अपराधांची संक्षिप्त रीतीने सुनावणी करून त्यांचा निर्णय केला पाहिजे; आणि केलेल्या दंडाची सर्व रक्कम, ती देण्यात कसूर झाल्यास अशा फौजदारी न्यायाधिशाच्या अधिपत्रान्वये अपराध करणाऱ्या इसमाची मालमत्ता जप्त करून व विकून वसूल करता येईल.

शहराबाहेरील ठिकाणी इन्साफ करण्यासंबंधी; दंड वसूल करण्यासंबंधी.

[२] [ बृहन्मुंबईच्या ] हद्दीत नसतील अशा ठिकाणी या अधिनियमाविरुद्ध घडलेल्या अपराधांची चौकशी करण्याचे व त्यांचा निर्णय करण्याचे काम, ज्या जिल्ह्यात अपराध घडला असेल त्या जिल्ह्यामध्ये क्षेत्राधिकार चालविणाऱ्या कोणत्याही फौजदारी न्यायाधिशाने केले पाहिजे आणि केलेल्या दंडाची सर्व रक्कम, [३][ दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलमे ३८६, ३८७ आणि ३८९ ] यात तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल.

---

[१] सन १९४२ चा मुंबई अधि. क्र. २१, कलम ६ तसेच सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५५, कलम २ द्वारे कलमे १४-च आणि १४-छ समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९४५ चा मुंबई अधि. क्र. १७, कलम ९ अनु. व तसेच सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५२, कलम २ परंतुकाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधि. क्र. ६०, कलम ४ (ट) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१६. [१] (दस्तुरी, मक्ते व दंड यांपासून मिळालेल्या रकमांचा विनियोग) सन १८८८ चा मुंबई अधिनियम १ याअन्वये रद्द करण्यात आले. (दस्तुरी, मक्ते व दंड यापासून मिळालेल्या रकमांचा विनियोग) सन १८८८ चा मुंबई अधि. १ याअन्वये रद्द करण्यात आला.

१७. [२] [ राज्य ] सरकारास, योग्य वाटतील असे निर्बंध घालून, पदसिद्ध या नात्याने ह्या अधिनियमान्वये मिळालेल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार कोणताही [३] [ * * * ] कमिशनर, कलेक्टर, फौजदारी न्यायाधीश किंवा इतर इसम याजकडे सोपविता येतील. राज्य सरकारास अधिकार सोपविता येतील.

[४][१७-क. (१) [२] [ राज्य ] सरकारास ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्याच्या कारणाकरिता नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम करण्यापूर्वी ते आगाऊ प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत. नियम व विनियम.

(२) विशेषकरून व मागील उपबंधाच्या सामान्यतेस बाध येऊ न देता पुढील सर्व किंवा कोणत्याही कारणाकरिता असे नियम करता येतील :--

(क) कोणत्याही नदीतून, ओढ्यातून, खाडीतून, तळ्यातून, तलावातून, किंवा जलयान जाऊ शकेल अशा इतर जलाशयातून भाडे घेऊन किंवा भाडे न घेता चालविण्यात येणाऱ्या जलयानांसाठी लायसन देणे व त्यांचे नियमन करणे आणि अशी जलयाने चालविण्यासाठी द्यावयाची लायसने देण्याचा, ती तहकूब करण्याच्या किंवा ती रद्द करण्याच्या कोणत्या अधिकाऱ्यांना आहे व ती कोणत्या शर्तीवर देता येतील ते व अशा लायसनसाठी किती फी द्यावयाची ते विहित करणे;

(ख) अशा जलयानांतून न्यावयाच्या उतारूंची, गाड्यांची व जनावरांची संख्या व मालाचे किंवा इतर वस्तूचे परिणाम ठरविणे;

(ग) अशा जलयानांनी दिवे नेण्यासंबंधी आणि ते लावून ठेवण्यासंबंधी नियमन करणे;

(घ) अशा जलयानांमधून उतारू, जनावरे, माल किंवा इतर वस्तू नेण्यासाठी किती भाडे आकारता येईल ते विहित करणे;

(ङ) अशा जलयानांमधील उतारूंनी वर्तन कसे ठेवावे यासंबंधी नियमन करणे;

(च) असे कोणतेही जलयान चालू असताना त्यावर आवश्यक असलेली साधनसामग्री व आवश्यक असलेल्या खलाशांची संख्या विहित करणे;

(छ) सामान्यत: अशा जलयानांतून सुरक्षितपणे, जलद व सोईस्कर रीतीने उतारू व माल नेणे व उतरविणे;

(३) जिल्हा फौजदारी न्यायाधिशास, वेळोवेळी, पुढील गोष्टींसंबंधी ह्या अधिनियमाच्या व त्या अन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधाशी विसंगत नसतील असे विनियम करण्याचा अधिकार आहे :--

[१] मुंबई स्थानिक मंडळे अधिनियम, १८८४ (१८८४ चा मुंबई १) द्वारे कलम १६ निरसित करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची ख द्वारे वरील मजकूर निरसित करण्यात आला. ही अनुसूची मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याच्या परिशिष्टात छापण्यात आली आहे.

[४] सन १९४२ चा मुंबई अधि. क्र. २१, कलम ७ तसेच सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५५, कलम २ द्वारे १७-क समाविष्ट करण्यात आले.

(क) त्याच्या अधिकारक्षेत्राच्या हद्दीतील कोणत्याही नदीतून, ओढ्यातून, खाडीतून, तलावातून, तळ्यातून किंवा जलयान जाऊ शकेल अशा इतर जलाशयातून चालविण्यासंबंधी जलयाने नियमन करणे, आणि

(ख) अशा जलयानांतून सुरक्षितपणे, जलद व सोईस्कर रीतीने उतारू नेणे व उतरविणे. ]

"जलयान" या संज्ञेची व्याख्या.

[1][ १७-ख. ह्या अधिनियमात "जलयान" ह्या संज्ञेत माणसांची, जनावरांची किंवा मालमत्तेची जलमार्गाने ने आण करण्यासाठी तयार केलेल्या कोणत्याही वस्तूचा समावेश होतो. ]

विवक्षित प्रकरणात कलमे १४क ते १४छ आणि १७क व १७ख यांचे उपबंध लागू नसणे

[1][ १७-ग. समुद्रावर किंवा भरतीच्या पाण्यावर किंवा कोणत्याही महत्त्वाच्या बंदरात चालणाऱ्या कोणत्याही जलयानाच्या संबंधात किंवा अंतर्देशीय बाष्प्‌ जलयान अधिनियम, १९१७, याचे कलम २, पोट-कलम (१) यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही अंतर्देशीय बाष्प-जलयानाच्या संबंधात किंवा भारतीय बंदरे अधिनियम, १९०८, याच्या ६ व्या कलमान्वये मिळालेले अधिकार चालवून दिलेल्या लायसनान्वये चालणाऱ्या कोणत्याही जलयानाच्या संबंधात्‌ कलमे १४-क ते १४-छ आणि १७-क व १७-ख यातील कोणताही उपबंध लागू असणार नाही. ]

१९०८ चा १५.

लघु संज्ञा.

१८. ह्या अधिनियमास मुंबईचा तरी [2][ व अंतर्देशीय जलयाने ] यांबाबत अधिनियम, १८६८, असे म्हणावे.

रद्द करणे आणि बचाव.

[3] [ १९. मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशास लागू असल्याप्रमाणेचा हैदराबादचा तरींबाबत अधिनियम, मुंबई राज्याच्या विदर्भ विभागास लागू असल्याप्रमाणेचा उत्तर भारताचा तरीबाबत अधिनियम, १८७८ आणि मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू असल्याप्रमाणे मुंबई तरी आणि अंतर्देशीय जलयाने यांबाबत अधिनियम, १८६८ हे यावरून रद्द करण्यात येत आहेत :--

१८१४ चा हैदराबाद २, एफ-१८७८ चा १७, १८६८ चा मुंबई २.

परंतु, उक्त अधिनियम अशा रीतीने रद्द केल्यामुळे,--

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमाच्या पूर्वीच्या अंमलास किंवा त्याअन्वये केलेल्या किंवा करू दिलेल्या कोणत्याही गोष्टीस, किंवा

(ख) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये प्राप्त झालेल्या कोणत्याही हक्कास, विशेषाधिकारास, पत्करलेल्या बंधनास किंवा प्राप्त झालेल्या जबाबदारीस, किंवा

(ग) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात प्राप्त झालेल्या कोणत्याही शास्तीस, जप्तीस किंवा शिक्षेस, किंवा

(घ) वर सांगितल्याप्रमाणेच्या अशा कोणत्याही हक्काच्या, विशेषाधिकाराच्या, बंधनाच्या जबाबदारीच्या, शास्तीच्या, जप्तीच्या किंवा शिक्षेच्या संबंधातील कोणत्याही चौकशीस, वैध कारवाईस किंवा उपाययोजनेस,

बाध येणार नाही आणि जणू मुंबईचा तरी आणि अंतर्देशीय जलयाने याबाबत (एकीकरण आणि सुधारणा) अधिनियम, १९५९, हा संमत झाला नव्हता असे समजून, अशी कोणतीही चौकशी करता येईल, वैध कारवाई चालू ठेवता येईल किंवा उपाययोजना करता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा लादता येईल :

१९५९ चा मुंबई ६०.

---

[1] सन १९४२ चा मुंबई अधि. क्र. २१, कलम ७ तसेच सन १९४७ चा मुंबई अधि. क्र. ५५, कलम २ अन्वये कलमे १७-ख व १७-ग समाविष्ट करण्यात आली.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये वरील मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्र. ६०, कलम ४ (१) द्वारे कलम १९ समाविष्ट करण्यात आले.

तसेच, अशा रीतीने रद्द केलेल्या अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा उपाययोजना (हीत काढलेल्या-अधिसूचना आणि निदेश, केलेले नियम, नेमणुका, दिलेली अधिकारपत्रे, सोपविलेली कामे आणि दिलेले मक्ते, दिलेली मंजुरी, अनुमती आणि माफी, सोपविलेले अधिकार आणि दिलेले आदेश हे जेथवर ह्या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील तेथवर त्यांचा आणि ठरविलेल्या दस्तुरींच्या दरांचा समावेश होतो) ही, या अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा उपाययोजना हीवरून तीत बदल किंवा सुधारणा करण्यात येईपर्यंत किंवा ती निष्प्रभावित करण्यात येईपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील. ]

## [१] [ अनुसूची

[२][ (कलम २-क पहा.) ]

| कोणत्या कलमा अन्वये | अधिकार |
|---|---|
| (१) | (२) |
| ३ | खंड (घ) अन्वये दस्तुरी देण्याची माफी देण्याच्या अधिकाराचा समावेश करून, [३] [ राज्य सरकारने ] चालवावयाचे अधिकार. |
| ४ | [३] [ राज्य सरकारने ] चालवावयाचे अधिकार. |
| ५ | [३] [ राज्य सरकारने ] चालवावयाचे अधिकार. |
| १२ | जिल्ह्याच्या कलेक्टराने चालवावयाचे अधिकार. |
| [४] [ * | * * * * * ] ] |

[१] ही अनुसूची सन १९२३ चा मुंबई अधि. क्र. ८, कलम ३ द्वारे जादा दाखल करण्यात आली.

[२] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्र. ६०, कलम ४ (ड) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश द्वारे पूर्वीच्या मजकुराऐवजी नवीन मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्र. ६०, कलम ४ (ड) अन्वये कलम १४ ची नोंद वगळण्यात आली.